जा.क्र.नांवाशमनपा/नसका/सिआर- 28/20
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक:- 08.12.2020

<u>नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.</u>

<u>सर्वसाधारण सभेची सूचना</u>

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनसूची ``ड`` चे प्रकरण-2 मधील नियम क्रं. 1 अन्वये

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूची (ड) च्र प्रकरण-2 मधील नियम क्रं 1 अन्वये प्राप्त अधिकारानुसार **मा. महापौर, सौ. मोहीनी विजय येवनकर,** यांनी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्व साधारण सभा **दिनांक 16.12.2020 रोजी दुपारी 01.00 वाजता ONLINE व्दारे आयोजीत केली आहे.**

करिता विनंती की, प्रस्तावित सभेस निर्धारीत समयी **ONLINE** सभेस उपस्थित राहून सहकार्य करावे

**स्वाक्षरीत/-**

**(मा. महापौर यांच्या मान्यतेने)** **(स. अजीतपालसिंघ संधु)**

**नगरसचिव**

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड**

**प्रति**

**श्री/श्रीमती -------------------------------**

**सदस्य /सदस्या,**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

<u>नगरसचिव कार्यालयाचा प्रस्ताव</u>

**विषय क्रं. 01**

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 20(3) नुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे स्थायी समितीचे 16 सदस्यापैकी खालील (8) सदस्य दिनांक 01.12.2020 रोजी दुपारी निवृत्त झालेले आहे.**

1) कोकाटे करुणा भीमराव, **भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष**
2) वाघमारे दयानंद नामदेव, **भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष**
3) यन्नम राजेश लक्ष्मीनारायण, **भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष**
4) कल्याणकर ज्योती किशन, **भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष**
5) पवळे पुजा बालाजी, **भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष**
6) अ. रशीद अ. गणी, **भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष**
7) फारुख हुसेन कासीम पिरान, **भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष**
8) जाधव श्रीनिवास नारायण, **भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष**

करीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 20(5) अन्वये नांवामनपाकेच्या स्थायी समितीच्या निवृत्त होणा-या वरील सदस्यांच्या रिक्त (8) जागावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 31-अ नुसार नविन (8) सदस्यांची नामनिर्देशानाव्दारे नेमणूक करण्यासाठी प्रस्ताव सादर.

<u>टिपः-</u> शासन परिपत्रक क्र. संकिर्ण-2010/प्र.क्र.-85/नवि-32 दिनांक 06 जूलै 2010 नुसार विरोधी पक्ष नेते, सभागृह नेते, गट नेत्यामार्फत स्थायी समितीवर तौलनिक संख्याबळाच्या आधारावर पालिका सदस्याची नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी नांवे पाठवितांना ती बंद लखोटयात सभेच्या वेळी महापौराकडे देण्यात यावीत. सभेच्या दिवसापुर्वी सदर नांवे महापौरांना बंद लखोटयात द्यावयाची असतील तर त्या पत्राची एक प्रत बंद लखोटयात, आयुक्तांना सुध्दा देण्यात यावी.

<u>आयुक्त यांच्याकडून प्राप्त कार्यालयीन प्रस्ताव</u>

**विषय क्रं. 02**

मनपा अशोकनगर येथील पशुवैद्यकिय दवाखान्यात नागरीक आपली पाळीव श्वाने उपचारासाठी घेवून येतात त्यांना इतर कोणत्याही प्रकाराचे आजार होऊ नये याकरीता 8 in 1 लस रुपये 350/- मध्ये देण्यात येत होती. पण सद्या बाजार मुल्यांकनानुसार 8 in 1 लसच्या किमंतीत वाढ झाली असल्यामुळे त्याच्यात रुपये 100/- चे वाढकरणे गरजेचे आहे.

करिता बाजार मुल्यांकनानुसार पशुवैद्यकिय दवाखान्यात देण्यात येणा-या विविध सेवांचे शुल्क कमी जास्त करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना देण्यास मान्यता देण्यात येते.

**विषय क्रं. 03**

**विषय** :- नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते वसंतराव नाईक कॉलेज ते रमामाता आंबेडकर चौक रस्त्यावरील वसंतराव नाईक कॉलेज परिसराची जागा संपादीत करणे बाबत

सालसन 2005-06 मध्ये सिडको-हाडको हा भाग मनपा मध्ये समाविष्ट झाला आहे. सिडको मधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते वसंतराव नाईक कॉलेज ते रमामाता आंबेडकर चौक हा प्रमुख रस्ता आहे.

सिडको प्रधिकरणाच्या विकास योजनेनुसार वसंतराव नाईक कॉलेज ते रमामाता आंबेडकर चौक हा रस्ता 15.00 मी. रुंदीचा आहे तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते वसंतराव नाईक कॉलेज हा रस्ता प्रारुप वाढीव विकास योजने नुसार 30.00 मी. रुंदीचा आहे. वसंतराव नाईक कॉलेज येथे रस्त्याची रुंदी 15.00 मी. ने कमी झाल्याने सदर ठिकाण अपघात स्थळ बनले असुन सदर ठिकाणी वाहतुकीची कोंडी होत आहे.

वसंतराव नाईक कॉलेज ते रमामाता आंबेडकर चौक प्रारुप वाढीव विकास योजने नुसार सदर रस्ता 18.00 मी. रुंद आहे

वसंतराव नाईक कॉलेज ते रमामाता आंबेडकर चौका पर्यंत 18.00 मि. रुंद रस्ता करण्याकरिता वसंतराव नाईक कॉलेजच्या परिसरातील जागा संपादित करणे आवश्यक आहे वसंतराव नपाईक कॉलेजच्या पश्चिम बाजू रस्ता संगमवार 30 मी. प्रमाणे व पुर्व बाजु जोड रस्त्यावर DP जवळ 18 मी. प्रमाणे रस्ता रुंद करावा लागेल जेणे करुन अडथ्ळयाचा (Bottelneck) भाग कमी होवुन रस्ता वाहतुकीस योग्य रुंदीत करता येणे शक्य आहे. त्यासाठी वसंतराव नाईक कॉलेजची मोकळी जागा अंदाजे 1500 चौ.मी. संपादीत करावी लागेल सदर जागेच्या मोबदला ऐवजी संबंधीत मालमत्ता धारकांना TDR / FSI अनुज्ञेय करता येईल.

करिता वसंतराव नाईक कॉलेजची जागा संपादीत करण्याच्या प्रस्ताव मनपा सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**विषय क्रं. 04**

श्री बालाजी बाबु चव्हाण कंत्राटी लसीकरण क्षेत्र सनियंत्रण व श्री प्रविण हरिदासराव अलकटवार कंत्राटी कार्यक्रम सहाय्यक यांनी कोविड-19 च्या काळामध्ये सुरुवाती पासुन आज पर्यंत आरोग्य सेवा देत आहेत त्यामध्ये राष्ट्री आरोग्य अभियान योजने अंतर्गत राष्ट्रीय कार्यक्रम लसीकरण, कुटूंब कल्याण, पोलीओ ई. कार्यक्रमा मध्ये आरोग्य सेवा देत आहेत.

कोविड-19 च्या सुरुवातीस जनताकर्फु व लॉकडाऊनच्या काळात रुग्णवाहिकेतुन पूर्ण नांदेड शहरात जनजागृती तसेच इतर शहरामधुन नांदेड शहरात येणा-या प्रत्येक व्यक्तीची थर्मलगणने तपासणी चे कार्य यांनी केले आहे.

कोविड-19 या संसर्गसन्य विषाणुच्या काळात मार्च-2020 पासुन सातत्याने आज पर्यंत नांदेड विमानतळ येथील आलेल्या प्रवाशांची तपासणी करणे, रेल्वेस्टेशन येथील प्रवाशांची तपासणी, गुरुव्दारा नांदेड येथे बाहेरुन आलेल्या भाविकांची आरोग्य तपासणी तसेच पॉझीटीव्ह आलेल्या रुग्णांचा मागोवा घेणे ई. कार्य करत आहेत.

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या | शासना मार्फत सध्या घेत असलेले वेतन | मनपा मार्फत अपेक्षीत वेतनवाढ |
|---|---|---|---|---|
| 01 | कंत्राटी लसीकरण क्षेत्र सनियंत्रक | 01 | 15,750/- | 8,550/- |
| 02 | कंत्राटी कार्यक्रम सहाय्यक | 01 | 12,000/- | 8,300/- |

वरील प्रस्ताव मनपा सर्वसाधारण सभेसमोर सादर.

**विषय क्रं. 05**

**नांदेड वाघाळा शहर महानबरपालिका हद्यीमध्ये रहदारी / वाहतुक जास्त असलेल्या ठिकाणी चौकामध्ये खुप मोठया प्रमाणात फुटपाथवर, सिग्नल पोलवर, सि.सि.टी.व्ही, कॅमेरा पोलवर मोठ मोठया आकाराचे विनापरवानगी खालील नमुद केलेल्या ठिकाणी जास्त प्रमाणात जाहिरात फलक / बॅनर लावले जात आहे.** त्यामुळे वाद निर्माण होत आहेत तसेच वाहतुकीस व पथ चालकास मोठया प्रमाणात अडथळा निर्माण होवून शहराचे विद्रुपीकरण होत आहे. अनाधिकृत जाहिराती घोषण फलक, होडींग, पोर्स्टस या संदर्भात जनहित याचिका क्रं. 155/2011 मधील मा. उच्च न्यायालय मुंबई यांच्या आदेशाची अमलबजावणी करणे व अनाधिकृत जाहिरात पवफलकांमुळे शहराचे होणारे विद्रुपीकरण थांबविणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीमध्ये (1) राज कॉर्नर (2) वर्कशॉप कॉर्नर (3) आय.टी.आय कॉर्नर (महात्मा फुले पुतळा) (4) शिवाजीनगर (5) वजिराबाद चौक (मुथा चौक) (6) देगलुर नाका, (7) अण्णाभाऊ साठे चौक इत्यादी ठिकाणी (खाजगी जागेवरील जाहिरात फलक वगळून) नो बॅनरल झोन घोषीत करणेसाठी मनपा सर्वसाधारण सभेपुढे मान्यतेस्तव सादर.

**विषय क्रं. 06**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका कार्यक्षेत्राअंतर्गत श्री गुरु गोविंदसिंघजी स्टेडीयम परिसरात श्री शंकरराव चव्हाण प्रेक्षागृहाची इमारत असून सदर प्रेक्षागृहाच्या माध्यमातून नागरीकांसाठी विविध मनोरंजनात्मक कार्यक्रम होत असतात सदर प्रेक्षागृहाची असान क्षमता 900 असून इतक्या आसन क्षमतेचे शहरामध्ये एकमेव प्रेक्षागृह आहे.

प्रेक्षागृहाच्या कामासाठी लागणारा निधी जिल्हा नियोजन व विकास योजने अंतर्गत उपलब्ध करुन घेण्यासाठी मा. जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड यांना शिफारस करण्यासाठी मनपा सर्वसाधारण सभेने ठराव क्रं. 78 दिनांक 22.11.2019 न्वये मान्यता प्रदान केल्यानुसार कार्यालयीन प्रस्ताव क्रं. साबांवि/15112/2020 व प्रस्ताव क्रं. नावाशमनपा/साबांवि/15113/2020 दिनांक 26.03.2020 नुसार जिल्हा नियोजन व विकास योजने अंतर्गत निधी उपलब्ध करुन देण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात

आला असता मा. जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा नियोजन समिती नांदेड यांचे आदेश क्रं. नियोजन/जिवायो/निधी/का-1/2019-20/868 दिनांक 26.03.2020 अन्वये रुपये 39.28 लक्षाची निधी सदर कामासाठी वितरीत केला असुन उर्वरीत निधी प्राप्तीसाठी कार्यालयीन पत्र क्रं. नावाशमतनपा/साबांवि/1318/2020 दिनांक 04.06.2020 अन्वये मागणी करण्यात आली आहे.

तसेच प्रेक्षागृहाचे आधुनिकिकरण व क्षमतावाढ करण्या बाबत शहरातील नाटयप्रेमाची आग्रही मागणी असल्याने सदर प्रेक्षागृहाचे आधुनिकिकरण व क्षमतावाढ तांत्रिक सल्लागार स्पेक डिझाईनर्स प्रा.लि. नागपुर यांनी सिव्हील कामासाठी रुपये 599.26 लक्ष व इलेक्ट्रीकल्स कामासाठी रुपये 396.26 लक्ष असे एकूण 995.47 लक्ष अपेक्षित किमंतीचे अंदाजपत्रक सादर केले त्यानुसार सदर अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

सदर प्रेक्षागृहाचे आधुनिकिकरण व क्षमतावाढ करण्याबाबत नाटय प्रेमीची आग्रही मागणी लक्षात घेऊन फेर सुधारीत रक्कमेचा म्हणजे रुपये 995.47 लक्षचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती नांदेड यांचेकडून पाठविणे व उर्वरीत निधी जिल्हा नियोजन व विकास योजने अंतर्गत उपब्धतेच्या अधिन राहुन सदर कामासाठी प्रशासकिय व आर्थीक मंजुरी प्रदान करुन संपूर्ण कामासाठी एकच निविदा मागणेसाठी प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 अन्वये मान्यतेस्तवचा प्रस्ताव मनपा सर्वसाधारण सभे समोर सादर

**विषय क्रं. 07**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील रस्त्यांवर मोकाट फिरणा-या जनावरांना पकडून बंदिस्त केल्यानंतर जनावरांच्या संबंधीत मालकांनी 10 दिवसात अशा जनावरांचा मालक म्हणून मुंबई महानगरपालिका अधिनियम 1949 मधील तरतुदीनुसार जनावरांची मागणी केली नाही किंवा कोंडवाडा फिस, खादय खर्च व अनामत रक्कम देण्यास नकार करील किंवा देण्यात कसुर करील अशा जनावरांना गोरक्षण संस्थेकडे देण्यासाठी स्थायी समितीने ठराव क्रं. 158 दिनांक 27.11.2006 अन्वये ठराव पारीत केलेला आहे.

सदरील ठरावाच्या अनुषंगाने महानगरपालिकेने कोंडवाडयातील विविध प्रकारची जनावरे योग्य प्रकारे पालन पोषण करण्यात येईल, अशा प्रकारचे लेखी हमीपत्र घेऊन गोरक्षण संस्थेत नि:शुल्क दिलेली आहेत.

सध्या नांदेड शहरात मोकाट जनावरांची संख्या मोठया प्रमाणात वाढलेली आहे त्यसामुळे वाहतुकीसाठी अडचण निर्माण होऊन अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे महापालिके तर्फे मोकाट जनावरे पकडण्याची मोहिम हाती घेवुन जनावरे कोंडवाडयात दाखल करीत आहे. परंतु कोंडवाडयाची क्षमता, अपुरा कम्रचारी वर्ग व जनावरांची उत्तम देखभार होणे करिता जनावरांचा बंदिस्त कालावधी 10 दिवसां ऐवजी 07 दिवस निश्चित करणे सोईचे होईल सदर कालावधी पुर्ण झाल्यानंतर बंदिस्त जनावरे गोरक्षण संस्थेस पाठवणे योग्य राहील.

करिता शसहरातील मोकाट जनावरांची संख्या, महापालिका कोंडावाडयाची क्षमता व अपुरा कर्मचारी वर्ग याबाबींचा विचार करता महापालिका कोंडवाडयात दाखल होणा-या जनावरांचा कालावधी 10 दिवसांऐवजी 07 दिवस निश्चित करुन त्यांना गोरक्षण संस्थेस नेवून देण्यासाठीचा प्रस्ताव मनपा सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**विषय क्रं. 08**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत **अमृत योजने अंतर्गत नांदेड शहर पाणी पुरवठा योजनेचे काम श्री डी. एम. मुरकुटे कंत्राटदार परभणी यांना** कार्यारंभ आदेश क्रं. 6802/2017 दिनांक 11.08.2017 अन्वये देण्यात आलेले आहेत. कामाची निविदा किमंत रुपये 23,46,53,422/- असून 17.79% कमी दराने निविदा स्विकृती किमंत रुपये 19,29,08,578/- आहे त्यास मा. स्थायी समिती सभेची मंजुरी प्राप्त आहे. या कामावर आता पर्यंत रुपये 13,22,56,527/- एवढा खर्च झालेला आहे सदरील योजनेचे कामे अंतिम टप्प्यात असून अंतिम देयक देणे बाकी आहे.

कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे पत्र क्रं. मजीप्राविनांदेड/लेखा/2031/2020 दिनांक 04.11.2020 अन्वये मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालय औरंगाबाद यांची मंजुरी घेवुन रुपये 20,07,217/- + 12% GST रुपये 193946/- = रुपये 22,01,0160/- एवढा रक्कमेचा निविदा खंड-38 चा प्रस्ताव या कार्यालयास सादर केला आहे. निविदा खंड-38 प्रमाणे प्रस्तावात कामाच्या मुळ वावामध्ये वाढ झाल्यामुळे जसे बाब क्रं. 1, 2, Sluice Valve पुरवठा करणे, बसविणे, बाबत क्रं. 3 HDPE Specials पुरवठा करणे तसेच बाब क्रं. 4 क्रॉस कनेक्शन करणे व बाब क्रं. 5 DI Specials पुरवठा करणे या बाबीमध्ये वाढ झाल्याने खंड-38 प्रस्ताव उदभवला आहे तो खालील प्रमाणे आहे.

| Clause 38 Amount | |
|---|---|
| A) Amount of Excess Quantity of 25% of Tender Quantity = | 390999.00 |
| B) Amount of Excess Quantity under Clause 38 = | 1616215.00 |
| C) Add 12% GST on cl 38 Amount = | 193946.00 |
| D) Total Amount of Excess Quantity under Clause 38 = (B+C) | 1810161.00 |
| E) Total Amount of Clause 38 (A+D) | 2201160.00 |

**सदरील निविदा खंड-38 चा वाढीव खर्च हा निविदा मंजुरी रक्कमेच्या आतच होणार आहे वरील प्रमाणे निविदा खंड-38 रुपये 22,01,160/- (अक्षरी रुपये बावीस लक्ष एक हजार एकशे साठ फक्त) चा प्रस्ताव GST सह मान्यता प्रदान करण्यासाठी सर्वसाधारण सभे समोर मान्यतेस्तव सादर.**

**विषय क्रं. 09**

**विषय :-** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका क्षेत्रातील जागा हस्तांतरणा बाबत

नांदेड जिल्हयात स्त्री रुग्णालय स्थापन करण्याच्या अनुषंगाने जिल्हा शल्य चिकित्सक नांदेड यांनी शामनगर नांदेड भागातील मातृसेवा केंद्र रुग्णालयाची जागा/इमारत महानगरपालिका नांदेड यांनी सार्वजनिक आरोग्य विभागाकडे हस्तांतरीत करावी अशी मागणी केली आहे.

त्यानुसार नांदेड जिल्हयासाठी स्त्री रुग्णालय स्थापन करण्यासाठी औपचारीक मंजुरी देणारा शासन निर्णय दिनांक 03.12.2010 रोजी पारीत झाल्याचे तत्कालीन मा. जिल्हाधिकारी नांदेड यांनी त्यांचे अर्धशासकीय पत्राव्दारे कळवुन नांदेड येथे स्त्री रुग्णालय स्थापन करण्याच्या प्रस्तावातील महत्वाचा टप्पा म्हणुन महानगरपालिकेची उक्त मालमत्ता शासनास हस्तांरीत करण्याच्या प्रक्रियेस तात्काळ गती दयावी अशी सुचना केली होती.

त्याअनुषंगाने नांदेड वाघाळा शहरम हानगरपालिका सर्वसाधारण सभेने ठराव क्रं. 166 दिनांक 30.12.2010 हा पारीत करुन अटी व शर्तीसह कस्तुरबा मातृसेवा केंद्राची नविन व जुनी इमारत व जागेची मालकी महानगरपालिकेची राहील या अटीवर मातृसेवा केंद्राची जुनी व नवि इमारत क्षेत्रफळ अनुक्रमे (G+1) 1099.66 चौ.मी. व 814.69 चौ.मी. परिसरासह निवासस्थापन सोठुन जिल्हा शक्यलय चिकित्सक जिल्हा रुग्णालय नांदेड यांना विना मोबदला हस्तांतरीत केली आहे.

कसतुरबा मातृसेवा केंद्र, शामनगर येथील महानगरपालिकेच्या मालकीची एगुण 6374.07 चौ.मी. क्षेत्रफळाची जागा असुन त्यावर इमारत बांधकामाचे एकूण क्षेत्रफळ 4800.96 चौ.मी. आहे. सदर जागा मालकी हक्कासह जिल्हा रुग्णालयास देऊन त्याऐवजी शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाची अयुक्त यांचे निवासस्थानाची 1638.76 चौ.मी. क्षेत्रफळाची जागा हस्तांतरीत करुन घेतल्यास क्षेत्रफळ परिमाणानुसार 4735.31 चौ.मी. क्षेत्रफळाची जागा अतिरिक्त स्वरुपात जिल्हा रुग्णालयास दिल्या जात आहे.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची **राम मनोहर लोहीया** वाचनालयाची इमारत यापुर्वी अस्तित्वात होती. तथापि महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीच्या बांधकामामुळे सदरची इमारत पाडण्यात आली. शहरातील नागरीकांची मागणी लक्षात घेता अत्याधुनिक वाचनालयाची इमारत बांधणे आवश्यक आहे तसेच आयुक्त यांचेसाठी निवासस्थान बांधणे आवश्यक आहे.

महापालिका देत असलेल्या एकुण 6374.07 चौ.मी. क्षेत्रफळाच्या जागेच्या मोबदल्यात वर नमुद केल्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांची विश्रामगृहासमोरील निशिगंध इमारत **आयुक्त** निवासस्थानाची 1638.76 चौ.मी. क्षेत्रफळाची जागा तसेच अतिरिक्त स्वरुपात देण्यात येत असलेल्या 4735.31 चौ.मी. क्षेत्रफळाच्या आरोग्य विभागास देण्यात आलेल्या जागेस पर्यायी जागा महापालिकेस उपलब्ध होठल व महानगरपालिकेस लोकोपयोगी कार्यायासाठी वाचनालय इमारत व आयुक्त निवासस्थापनासह स्वत:च्या मालकीची जागा उपलब्ध होईल.

करिता यानुसार महानगरपालिकेची जागा हस्तांतरणासाठी व त्या मोबदल्यात शासनाची जमिन हसतांतरीत करुन घेण्यासाठी प्रस्ताव शासनास पाठविणे इत्यादी वैधानिक कार्यवाहीस्तव प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79 अन्वये मनपा सर्वसाधारण सभेसमोर सादर.

**विषय क्रं. 10**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत नांदेड शहरातील मलनिस्सारण वाहीन्या कांही भागात नादुरुस्त आहेत. तसेच कांही भागात मलनिस्सारण वाहीन्या टाकण्याचे काम शिल्लक राहीलेले असुन कांही भागात मलनिस्सारण जोडणी व घरगुती जोडणीचे काम शिल्लक राहीलेले असल्याने कांही प्रमाणात मलप्रवाह नाल्याच्या मार्गाने वाहुन गोदावरी नदीपात्रात जात असुन नदी प्रदुषित होत आहे. त्यावर उपाय योजना म्हणुन ब-याच कालावधीपासून प्रयत्न चालू आहेत. तसेच सदर दुषित पाणी प्रतिबंध करणे करीता शासन स्तरावर पाठपुरावा चालू असुन प्रदुषित पाणी शुध्दीकरण करणे करिता मनपा मार्फत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे करिता तांत्रिक सल्लागार म्हणून श्री चंद्रशेखर कु-हे, नांदेड यांची नेमणुक करण्यात आलेली असुन संबंधीत तांत्रिक सल्लागाराने शहरातील प्रभाग निहाय अंथरलेल्या मलवाहीन्या, नादुरुस्त असलेल्या मलवाहीन्या, शिल्लक राहीलेल्या मलवाहीन्या व शिल्लक राहीलेले जोडणी यांचे सर्वेक्षण करुन सदर मलवाहीन्यां पुर्ववत करणे, संलग्नीकरण करणे व कांही भागात नविन मलवाहीन्या टाकणे, घरगुती जोडणी व त्यासाठी लागणारे मशिनरीज याचा समावेश करुन नांदेड शहरात एकूण 375 कि.मी. मलवाहीन्यां टाकण्याचा समावेश करुन प्राथमिक प्रकल्प अहवाल तयार केलेले असुन त्यावर अपेक्षित खर्च रुपये 220 कोटी अपेक्षित आहे.

सदर लागणारा निधी साठी शासनाकडे मागणी करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत सदर कामासाठी निधी उपलब्ध होण्यासाठी तरतुद आहे. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग शाससन निर्णय क्रं. एनयुआर-2008/प्र.क्र.203/नवि-33 मंत्रालय मुंबई दिनांक 20 फेब्रुवारी 2010 मधील अ.क्रं. 6 मधील III क मधील ड वर्ग महानगरपालिकेसाठी 50% अनुदान (प्रकल्पाच्या मंजुर किमंतीपैकी) व 50% MUIDCL/MMRDA मार्फत कमाल कर्ज मर्यादा (प्रकल्पाच्या मंजुर किमंतीपैकी) अशी तरतुद आहे. अथवा महानगरपालिकेला 15व्या वित्त आयोग मधून किंवा इतर वित्तीय संस्थांकडून कर्ज स्वरुपात 50% स्वहिस्सा उभा करावा लागेल.

वरील तरतुदी प्रमाणे महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत सदर कामासाठीच्या रुपये 220 कोटीचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी पाठविणे करिता मनपा सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**विषय क्रं. 11**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड हद्यीत अद्यावत फिश मार्केटची सुविधा उपलब्ध नसुन सध्याच्या मासळी बाजार ईतवारा, तरोडा नाका आणि कांही विक्रेते अस्वच्छ स्थितीत रस्त्याच्या कडेला व्यापार करीत आहेत. सदर विक्रेते तात्पुरते छप्पर बनवुन व स्वच्छतेची देखभाल न करता अतिशय वाईट स्थितीत माशाची ड्रेसींग करतात त्यामुळे आरोग्याच्या दृष्टीने अद्यावत आरोग्यदायी फिश मार्केटची शहरात सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजना जिल्हास्तरीय समिती सभेतील सुचनेनुसार महानगरपालिकेच्या मालकीच्या CTS No. 10931 (जुना लॉयन्स क्बल दवाखाना) नवा मोंढा दांतीवाला पेट्रोलपंपा जवळील जागेमध्ये अद्यावत आरोग्यदायी फिस मार्केट बांधकामाचा आराखडा व अंदाजपत्रक अनुभवी तज्ञ सल्लागार यांचेकडून तयार करुन घेण्यात आला आहे. अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता घेण्यात आलेली आहे. दिनांक 02.11.2020 रोजी सदरील प्रस्ताव निधी मिळणेबाबत मा. जिल्हाधिकारी नांदेड यांना प्रधानमंत्री मत्सयसंपदा योना व नाविन्यपुर्ण योजनेतुन रुपये 4,71,90,451/- सादर केलेला आहे.

<u>**प्रस्तावित फिश मार्केटची ठळक वैशिष्टय खालील प्रमाणे आहेत.**</u>

01 प्रस्तावित बांधकामाची ईमारत तळमजला व पहिला मजला प्रकारमध्ये असून त्यामध्ये एकूण 30 दुकाने (तळ मजला 22 दुकाने व पहिला मजला - 18 दुकाने) तसेच पुरुष व महिलांसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहाची सुविधा प्रस्तावित करण्यात आली आहे.

02 सदर दुकानामध्ये प्रदर्शन टेबल्स, ओटे, पाणी पुरवठा व्यवस्था इत्यादी सुविधा प्रस्तावित करण्यात आल्या आहेत.

03 ओले मासे व सुके माशांसाठी दोन मजल्यावर स्वतंत्र व्यवस्था प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

04 ठोक पुरवठा (होलसेलर्स) करणा-यांसाठी लिलाव हॉल प्रस्तावित करण्यात आला आहे.

05 शुध्द बर्फाच्या पुरवठयासाठी दोन आईस फ्लॅक मशीन्स प्रस्तावित आहेत

06 मुबलध्द प्रमाणात साठवण व पॅकींगची जागा उपलब्ध असून भविष्यात कोल्ड स्टोरेज किंवा शितकरण सविधा शक्य होणार नाही.

07 महाराष्ट्र प्रदुषण महामंडळाच्या निकषानुसार सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी 2 केएलडी क्षमतेचा ट्रीटमेंट प्लॅंट प्रस्तावित आहे.

सदर फिश मार्केटचे बांधकाम करणे बाबत प्रधानमंत्री मत्स्यसंवर्धन योजना व जिल्हा नियोजन व विकास समिती यांचंकडून निधी मागणेच्या मान्यतेकरिता प्रस्ताव महानगरपालिकेपुढे सादर.

**विषय क्रं. 12**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत प्रभाग क्रं. 11 ब्रम्हपुरी भागातील बिएसयुपी योजने अंतर्गत ड्रेनेज व पाणी पुरवठा कामास अतिरिक्त खर्च झाल्यामुळे निधी अपूरा पडत असल्यामुळे कामाचे अंदाजपत्रक रुपये 31,83,342/- (अक्षरी रुपये एकतीस लक्ष त्रयांशी हजार तीनशे बेचाळीस फक्त) हे दक्षता पथक व कार्यकारी अभियंता मलनिस्सारण यांनी संयुक्त स्थळ पाहणी करुन सादर केले आहे सदर भागात बिएसयुपी योजनेत सिमेंट रस्ते मंजुर आहेत सदर सिमेंट रस्ते करण्यापुर्वी ड्रेनेज लाईनचे काम करणे आवश्यक असल्यामुळे सदरील ड्रेनेज लाईन टाकणे आवश्यक आहे. सदरील कामासाठी मा. महापौर यांचे पत्र दिनांक 12.06.2019 अन्वये मनपा निधीतून घेण्यासाठी सुचविले आहे.

करिता सदरील कामासाठी लागणारा खर्च सालसन 2020-21 च्या मलनिस्सारण मुळ काम या लेखा शिर्षकातून खर्च करण्यास प्रशासकिय व आर्थीक मंजुरी प्राप्त करणेसाठीचा प्रस्ताव मनपा सर्वसाधारण सभेसमोर सादर.

**विषय क्रं. 13**

निसर्गाशी असलेली कटिबध्दता निश्चित करण्यासाठी निसर्गाशी संबंधीत पृथ्वी वायू, जल, अग्नी आणि आकाश या पंचतत्वावर पर्यावरण व वाहावरणीय बदल विभाग कार्य करीत असुन त्या अनुषंगाने शासन निर्णय दिनांक 14 ऑक्टोंबर 2020 अनवये माझी वसुधरा अभियान हे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये दिनांक 02 ऑक्टोंबर 2020 ते 31 मार्च 2021 या सहा महिण्याच्या कालावधीत राबविण्यास शासन मान्यता दिलेले आहे. सदर योजने अंतर्गत अग्नी तत्वाशी संबंधीत ऊर्जेचा परिणामकारक वापर, उर्जा बचत तसेच ऊर्जेचा अपव्यय टाळणे या बाबींना प्रोत्साहन देणेसाठी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या विविध इमारतीवर सोलार पॉवर प्लॉन्ट आस्थापित करणे गरजेचे आहे. तसेच या कामासाठी लागणारा निधी जिल्हा नियोजन समितीकडुन प्राप्त करुन घेणेसाठी मंजुरी करिता प्रस्ताव महानगरपालिका सर्वसाधारण सभेसमोर सादर.

**विषय क्रं. 14**

**विषय** :- विविध योजनेची अपुर्ण कामे पूर्ण करण्याकरिता रुपये 150.00 कोटीच्या घेतलेल्या कर्जाची पुर्नरचना करणे बाबत

**संदर्भ** :- 1) नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभा दिनांक 14.10.2016 ठराव क्रं. 94

2) नगरविकास विभाग शासन निर्णय क्रं. संकीर्ण-2017/प्र.क्र.122/नवि-33 मंत्रालय मुंबई दिनांक 24 मार्च 2017 अन्वये कर्ज घेण्यास शासनाची परवानगी

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने मनपाकडील पुर्वीचे कर्ज परतपवफेड करणे तथा JNNURM-I, JNNURM-II, BSUP व नगरोत्थान योजनेतील शिल्लक विकास कामे पुर्ण करणे करिता संदर्भांकित ठराव तसेच शासनाच्या प्राप्त परवानगी अन्वये HUDCO कडून सन 2017 मध्ये रुपये 150.00 कोटीचे कर्ज घेतले आहे. सदरील कर्जाची पहीला हप्ता रुपये 51.65 कोटी (दिनांक 30.02.2017), दुसरा हप्ता रुपये 50.00 कोटी (दिनांक 01.03.2018), तिसरा हप्ता रुपये 10.00 कोटी (दिनांक 26.11.2118) तर चौथा हप्ता रुपये 38.35 कोटी (दिनांक 02.01.2019) असे एकूण रुपये 150.00 कोटी चार हप्त्या मध्ये मनपास प्राप्त झाले आहेत.

सदरील रुपये 150.00 कोटींच्या कर्जाची परतफेडीसाठी एकूण 15 वर्षाचा कालावधी निश्चित केला असुन सदरील कर्जाच्या परतफेडीसाठी त्रैमासिक हप्ते असुन मे 2017 ते फेब्रुवारी-2032 पर्यंत असे एकूण 60 हप्ते परतफेडीचा कालावधसी निश्चित केलेला आहे. निश्चित केलेल्या कालावधी प्रमाणे सद्य कर्ज परतफेडीसाठी स्थितीमध्ये त्रैमासिक हप्ता रुपये 6.13 कोटी (मुद्दल रुपये 3.50 कोटी + व्याज रुपये 2.63 कोटी) या प्रमाणे वार्षी रुपये 24.50 कोटी एवढा रक्कम लागत आहे तसेच कर्जाच्या परतफेडीचा हप्ता माहे ऑगस्ट-2021 मध्ये कमी होऊन मुद्दल रक्कम रुपये 3.50 कोटी ऐवजी रुपये 2.15 कोटी तसेच नियमाप्रमाणे प्राप्त होणारे व्याज अशी परतफेड करावयाची आहे.

सदरील कर्ज हे मनपाचे स्वउत्पन्ना मधुन विकास शुल्क तथा वित्त आयोगाच्या प्राप्त होणा-या रक्कमेतुन कर्ज परतफेड करण्यात येत आहे. शासनाकडुन सन 2019-20 पर्यंत वित्त आयोगाकडुन 14व्या वित्त आयोगा अंतर्गत प्राप्त होणारे अनुदान हे कर्ज परतफेड करणे तथा इतर अनुषंगीक कामासाठी प्रमाणात प्राप्त झाले आहे. परतु वित्त आयोगाकडुन 15व्या वित्त आयोगाअंतर्गत प्राप्त होणारा निधी हा अत्यल्प प्रमाणात प्राप्त होत आहे. त्या अनुषंगाने मनपाकडील HUDCO कडील कर्ज हे मनपाच्या स्वउत्पन्नाच्या विकास शुल्क व हार्डशिप तथा इतर कराच्या रक्कमेतुन भरणा करण्याची वेळ उदभवत आहे. त्यामुहे कर्जाच्या परतफेडीसाठी त्रैमासिक असलेल्या हप्त्याची रक्कम कमी करणे तथा कर्ज परतफेडीचा कालावधी वाढ करणे आवश्यक आहे. जेणे करुन मनपाच्या अत्यावश्यक कामांवर परीणाम होणार नाही व कर्जाचा हप्ता परतफेड करणे सोईचे होईल.

करिता हुडको कडील कर्जाची मुदत वाढ घेणेकरिता सदरील प्रस्तावास मान्यता देवुन HUDCO वित्तीय संस्थेस पत्र व्यवहार व अनुषंगीक बाबी या करिता आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**विषय क्रं. 15**

**विषय** :- नांदेड वाघाळा शहर महानगरपलिका हद्यीतील JNNURM रस्ता क्रं. 32 च्या बाजुस विमानतळ सुरक्षा भिंती लागतच्या जागेत जॉगिंग ट्रॅक, परिसराचे लॅन्डस्केपिंग व ग्रीन जिम तयार करणे बाबत

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका क्षेत्रातील JNNURM रस्ता क्रं. 32 या रस्त्यावर दररोज मोठया संख्येने नागरीक मॉर्निंग वॉकसाठी येत असल्यामुहे सकाळी या रस्त्यावर पादचा-यांची मोठी गर्दी होत आहे. सदर रस्ता हा शहराबाहेर जाण्यासाठीचा एक मुख्य रस्ता असुन मोठया व अवजड वाहनांच्या रहदारीचा आहे. मॉर्निंग वॉकसाठ येणा-या नागरीकांची संख्या लक्षात घेता JNNURM रस्ता क्रं. 32 चा पदपाथ मॉर्निंग वॉकसाठी अपुरा पडत आहे परिणामी नागरीक रस्त्यावर मॉर्निंग वॉक करत आहेत सदर बाब नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातुन महत्वाची असुन पदपाथा शेजारील मोकळया जागेत जॉगिंग ट्रॅक करुन देण्याची नागरीकांची ब-याच वर्षापासुन मागणी आहे.

सदर रस्ता व विमानतळाची सुरक्षा भिंत यामध्ये साधारणत: 18 मी चे अंतर असुन यामध्ये जॉगिंग ट्रॅक, परिसराचे लॅन्डस्केपिंग व ग्रीन जिम चे साहीत्य नागरीकांसाठी उपलब्ध करुन दिल्यास परिसराचे सुशोभिकरण होवुन नागरीकांना नैसर्गिक वातावरणात सुरक्षितपणे मॉर्निंग वॉकचा लाभ घेणे शक्य होईल.

यानुसार सदर रस्त्याच्या बाजुस जॉगिंग ट्रॅक, परिसराचे लॅन्डस्केपिंग व ग्रीन जिम विकसित करण्यासाठी जिल्हा नियोजन व विकास समितीकडे प्रस्ताव सादर करुन निधीची मागणी करणे व उपलब्ध निधीतुन काम हाती घेण्यासाठीचा प्रस्ताव मनपा सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**विषय क्रं. 16**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत दि.अ.यो. राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान (DAY-NULM) अंतर्गत नागरी बेघरासाठी निवारागृह उभारने या घटका अंतर्गत बेघर व्यक्तीसाठी निवारागृह नव्याने बांधण्यासाठी या चालू आर्थीक वर्षात भौतिक व आर्थीक दृष्टीये निर्गमित करण्यात आलेले असुन त्यानुसार 01 निवारागृहाचा (DPR) सविस्तर प्रकल्प अहवाल सादर केलेला आहे त्यामध्ये गोकुळनगर पोलीस चौकी व हरिहरराव सोनुले कॉम्पलेक्स या दोन्ही मधील जागा असुन त्याचे सविस्तर प्रकल्प अहवालानुसार एकूण क्षेत्रफळ 30 मि. X 16 मि. एकूण 480 चौ.मि. मध्ये बांधकाम जे की G+1 असून एकूण 06 हॉल आहेत.

1 हॉल 6.34 X 8.36 असे 53 चौ.मिटर या मध्ये एकूण 11 बेडची व्यवस्था आहे असे 04 हॉल पुरुषां करिता तळ मजल्यावर व पहिल्या मजल्यावर 02 हॉल 22 महिलांसाठी व गार्ड रुम, किचन, स्टोर, केस इत्यादीचा समावेश करण्यात आलेला आहे.

सदर निवारागृह बांधकामाच्या प्रस्तावित रक्कमेस यापुर्वी मनपा सर्वसाधारण सभा दिनांक 27.02.2017 रोजी ठराव क्रं. 133, मनपा सर्वसाधारण सभा दिनांक 10.05.2018 रोजी ठराव क्रं. 49 अन्वये मान्यता घेण्यात आलेली होती परंतु मा. सह संचालक अ.शा. पत्र क्रं. NULM/SUH/का-11/2020-21/2106 दिनांक 08.10.2020 अन्वये नगरपरिषद प्रशासन संचालनपालय वरळी मुंबई यांनी निर्देशित केल्याप्रमाणे राज्य दरसुचित 2020-21 नुसार तयार करण्यात आलेल्या DPR Estimate नुसार येणा-या खर्चास मनपा सर्वसाधारण सभेची मान्यता आवश्यक आहे.

करिता उपरोक्त निवारागृह बांधकामासाठी दि.अ.यो. राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत निधी प्राप्त होणार असुन सदर काम करण्याकरिता व सविस्तर प्रकल्प अहवाल नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांची मान्यता घेऊन पुढील कार्यवाही नियमानुसार करण्यासाठी मनपा सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**विषय क्रं. 17**

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.**

**प्रत्यक्षात स्वच्छता विभागांतर्गत काम करणा-या कर्मचा-यांना सार्वजनिक/शासकीय सुट्टयात केलेल्या कामाचे आर्थिक मोबदला देणेसाठीचा उपविधी**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड स्वच्छता आस्थापनेवर कायम कार्यरत कर्मचायांना सार्वजनिक व शासकीय सुट्टीच्या दिवशी केलेल्या कामाचा आर्थिक मोबदला संबंधित महिनाच्या वेतनासोबत देणेसाठी प्रारुप उपविधी.

ज्या अर्थी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 458 अन्वये प्रकरण 12, प्रकरण 18, प्रकरण 19 व अनुसूचि मधील प्रकरण–14 अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका स्वच्छतेच्या आस्थापनेवरील कायम (स्थायी) स्त्री/ पुरुष सफाई कामगार जे प्रत्यक्षात स्वच्छता प्रभागात सार्वजनिक व शासकीय सुट्टी तसेच मा.जिल्हाधिकारी, नांदेड यांनी स्थानिक प्राधिकारणातील कार्यालयांना जाहिर केलेल्या स्थानिक सुट्ट्यात काम करणा-या सफाई कर्मचा-यांना केलेल्या कामाचा आर्थिक मोबदला देणेसाठी महानगरपालिकेने खालील प्रमाणे उपविधी तयार करण्याचे योजीले आहे.

**1. संक्षिप्त नांव**

या उपविधीस " नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका स्वच्छतेच्या आस्थापनेवरील कायम (स्थायी) व प्रत्यक्ष स्वच्छता प्रभागात काम करणा-या कर्मचा-यांना सुट्टीच्या दिवशी केलेल्या कामाचा आर्थिक मोबदला देणे "

**2. व्याख्या**

संदर्भा नुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर

1) कायदा म्हणजे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम असा समजण्यात यावा.
2) महानगरपालिका म्हणजे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका.
3) आयुक्त म्हणजे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 69(1) अन्वये आयुक्तांना प्रदान केलेले अधिकार, कर्तव्य आणि कार्य करण्याकरीता नेमलेल्या कोणताही शासकीय अधिकारी.
4) ज्या शब्दाची व्याख्या या उपविधीत समाविष्ठ नसेल, तर त्या शब्दाचा कायद्यान्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी अर्थी अर्थ लावण्यात येतील.

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक:सफाई-2016/प्र.क्र.370/ नवि-20, दि.27 सप्टेंबर, 2016 अन्वये शासन परिपत्रक दि.09 ऑक्टोबर 1989 अन्वये राज्यातील महानगरपालिका/नगरपालिकेतील कर्मचा-यांप्रमाणे सफाई कर्मचा-यांना शासकीय सुट्टया देण्यात याव्या. तसेच सुट्टीच्या दिवशी सफाई कर्मचा-यांना काम करणे अपरिहार्य असल्यास त्यांना आर्थिक मोबदला महानगरपालिका/नगरपालिकांनी द्यावा. त्याप्रमाणे त्यांनी उपविधी तयार करावेत व संबंधित अधिका-यांकडून मंजूर करून घ्यावेत असे नमुद आहे.

तसेच दि. 12 ऑगष्ट, 1975 रोजीच्या शासन परिपत्रकानुसार सफाई कामगारांना दरवर्षी येणा-या सुट्टया जसे की, 26 जानेवारी, 15 ऑगष्ट, वाल्मिकी जयंती, आणि विर गुगादेव जयंती या चार दिवसांची राष्ट्रीय सुट्टी अनुज्ञेय असल्याने सदर चार दिवसाच्या सुट्टयात केलेल्या कामाचा आर्थिक मोबदला सफाई कामगारांना अनुज्ञेय राहील असे आहे.

दि. 27.09.2016 रोजीच्या शासन परिपत्रकानुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका स्वच्छतेच्या आस्थापनेवर कार्यरत स्थायी (कायम) सफाई स्त्री / पुरूष सफाई कामगार / कर्मचारी जे मुळ पदावर स्वच्छता प्रभागात प्रत्यक्ष स्वच्छतेचे / साफसफाईचे काम करत असतील अशा सफाई कामगारांना सार्वजनिक सुट्यांच्या दिवशी केलेल्या कामाचा आर्थिक मोबदला देणेबाबत नमुद आहे.

सर्व प्रथम सफाई कामगारांना साप्ताहीक सुट्टी देण्यात येते का याची शहानिशा करण्यात आली. त्यात संबंधित क्षेत्रिय अधिकारी/स्वच्छता निरिक्षक हे नियमातील तरतुदीन्वये एक दिवसाची साप्ताहीक सुट्टी देण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासनाचे परिपत्रक/शासन निर्णय दि. 31.08.1988 व 24.02.2020 अन्वये ज्यांची सेवा अत्यावश्यक समजल्या जातात अश्यांना 05 दिवसाचा आठवडा लागू राहणार नाही. असे स्पष्ट नमुद असल्यामुळे प्रत्यक्षात स्वच्छता प्रभागात काम करत असल्याने 05 दिवसाचा आठवडा सफाई कामगारांना लागू होणार नाही.

**महाराष्ट्र शासनाने राज्यात प्रत्येक सालसनासाठी शासन अधिसुचनेद्वारे जाहिर केलेल्या सार्वजनिक/शासकीय सुट्टी ।जसे की, 1) प्रजासत्ताक दिन, 2) छत्रपती शिवाजी महाराज जयंती, 3) महाशिवरात्री, 4) होळी (दुसरा दिवस), 5) गुढीपाडवा, 6) रामनवमी, 7) महावीर जयंती, 8) गुड फ्रायडे, 9) डॉ.बाबसाहेब आंबेडकर जयंती, 10) महाराष्ट्र दिन, 11) बुध्द पौर्णिमा, 12) रमझान ईद (ईद-उल-फितर) (शव्वल-१) 13) बकीर ईद (ईद-उल-झुआ), 14) स्वातंत्र्य दिन, 14) पारशी नववर्ष दिन (शहेनशाही), 16) गणेश चतुर्थी, 17) मोहरम, 18) महात्मा गांधी जयंती, 19) दसरा 20) ईद-ए-मिलाद, 21) दिवाळी अमावस्या (लक्ष्मीपूजन), 22) दिवाळी (बलिप्रातिपदा), 23) गुरुनानक जयंती, 24) ख्रिसमस। च्या दिवशी व मा.जिल्हाधिकारी, नांदेड यांनी स्थानिक प्राधिकारणातील कार्यालयांना जाहिर केलेल्या स्थानिक सुटट्या प्रत्यक्षात स्वच्छता प्रभागात काम करणा-या संबंधित सफाई कामगारांनाच आर्थिक मोबदला अनुज्ञेय राहील.**

**तथापी, उक्त सार्वजनिक/शासकीय सुट्टी किंवा जिल्हाधिकारी यांनी स्थानिक प्राधिकारणातील कार्यालयांना जाहिर केलेल्या स्थानिक सुट्टी ही उक्त सर्व कर्मचा-यांच्या साप्ताहीक सुट्टीच्या दिवशी येत असेल तर, त्याचा आर्थिक मोबदला अनुज्ञेय राहणार नाही.**

**करीता सार्वजनिक/शासकीय सुट्टीच्या दिवशी तसेच मा.जिल्हाधिकारी, नांदेड यांनी स्थानिक प्राधिकारणातील कार्यालयांना जाहिर केलेल्या स्थानिक सुट्टीच्या दिवशी प्रत्यक्ष स्वच्छता प्रभागात काम करणा-या सफाई कामगारांनाच आर्थिक मोबदला संबंधित सफाई कामगारांचे ज्या महिन्याचे मासिक वेतन असेल, त्याच महिन्याच्या मासिक वेतनात समाविष्ठ करुन आर्थिक मोबदला देणे अनुज्ञेय राहील.**

महानगरपालिका सर्वसाधारण सभेत उपविधी मंजूर झाल्यावर त्याचे स्वतंत्ररित्या आदेश निर्गमित झालेल्या तारखेपासूनच सार्वजनिक/शासकीय सुट्टया तसेच मा.जिल्हाधिकारी, नांदेड यांनी स्थानिक प्राधिकारणातील कार्यालयांना जाहिर केलेल्या स्थानिक सुट्टीच्या दिवशी केलेल्या कामाचा आर्थिक मोबदला देय राहील.

तथापी, यापुर्वीचे सार्वजनिक/शासकीय सुट्टया तसेच मा.जिल्हाधिकारी, नांदेड यांनी स्थानिक प्राधिकारणातील कार्यालयांना जाहिर केलेल्या स्थानिक सुट्टीमध्ये केलेल्या कामाचा आर्थिक मोबदला अनुज्ञेय राहणार नाही.

तसेच उक्त प्रमाणे स्वच्छता प्रभागांतर्गत सफाई कर्मचा-यांवर देखरेख करण्यासाठी सर्व स्वच्छता निरिक्षक व त्यांच्या अधिनस्तव प्रभागातील शिपाई यांना पण उक्त प्रमाणे आर्थिक मोबदला देणे योग्य राहील.

करिता महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक:सफाई-2016/ प्र.क्र.370/नवि-20, दि.27 सप्टेंबर 2016 अन्वये सदरची उपविधी तयार करण्यात आली असून, महानगरपालिका सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**स्वाक्षरीत/-**
**(स. अजीतपालसिंघ संधु)**
**नगरसचिव**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड**